REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# आज्ञापत्राचे वाङमयीन सौंदर्य

प्रा. डॉ. मिना जुनघरे
शिवशक्ती कला वाणिज्य व विज्ञान , महाविद्यालय बाभुळगांव जि. यवतमाळ.

## प्रस्तावना —

'आज्ञापत्र' हा शिवराजाच्या राजनितीचा व राजव्यवस्थेचा आढावा होणारा छोटेखानी व नेटक्या भाषेत लिहिलेल्या ग्रंथ आहे. या ग्रंथाचा अभ्यास केल्या नंतर शिवकालानंतरच्या गदय वाङमयाची जाणीव हाते. अठराव्या शतकाच्या प्रारंभी हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिला असावा असे अनेक अभ्यासकांचे मत आहे. पण काहींच्या मते आज्ञापत्र शिवाजी महाराजांचे प्रधान मोरोपंत पिंगळे यांचे चिरंजीव निळो




मोरेश्वर पिंगळे यांनी लिहिले आहे. पण आज्ञापत्राचा काळ लक्षात घेता हे शक्य नाही असे वाटते कारण आज्ञापत्र इ.स. 1715 मध्ये लिहिले गेले तर निळकंठ मोरेश्वर याचा मृत्यू इ.स. 1708 मध्ये झाला. त्यामुळे आज्ञापत्राच्या कर्त्यासंबंधीचे हे मत ग्राहय मानता येत नाही.

आज्ञापत्रा चे दोन भाग असून एकूण नऊ प्रकरणे आहेत प्रकरण पहिले व दुसरे मिळून पहिला भाग प्रास्ताविक स्वरुपाचा असून या भागात ही राजनिती केव्हा, कोणी व कोणत्या निमित्ताने सांगीतली याचे वितरण येते. दुसऱ्या भागात शिवाजीची विशिष्ट राजनिती, राजधर्म, प्रधानसंयोजन, साहूकारांचे महत्व, वतनदाराचे नियंत्रण, वृत्ती-इनाम देण्याचे प्रतिकुलत्व, गडकोटांचा बंदोबस्त, आरमाराचे महत्व व त्याची व्यवस्था असे विषय आले आहेत.

## वाङमयीन वैशिष्टये :

राजनितीची विशिष्ट तत्वे विशद करुन सांगणारा ग्रंथ या दृष्टीने तर या ग्रंथाचे महत्व आहेच पण वाङमयीन दृष्टीने देखील हा ग्रंथ अनन्यसाधारण आहे.

## संस्कृत प्रचुरता :

'आज्ञापत्रा' चे प्रास्ताविक व मुख्य राजनिती हे जे दोन भाग केले आहेत. त्या दोन्ही भागाची शैली भिन्न भिन्न आहे. मुख्य भागाच्या भाषेपेक्षा प्रास्ताविकाची भाषा अधिक संस्कृत प्रचुर आहे. वाक्येही अधिक लांब, संयुक्त स्वरुपाची आहेत. उदा. 'ज्यांनी परंपरेने येकनिष्ठपणे सेवा करुन या राज्यात आपल्या नाम्ना संपादिल्या. यैसे ही कितेक सेवक होते. त्यांनी अवसान सोडोन परंपरागत मेळविले अधिकराचा परिच्छिन्न परित्याग करुन इतरावलंबी जाहले'. हे वाक्य मोठे, संयुक्त आहे शिवाय संस्कृत शब्दाचा वापरही बऱ्याच वेळा केलेला दिसतो.

शैलीच्या दृष्टीने उज्वल असा एकच भाग या प्रास्ताविकात आहे. तो म्हणजे शिवाजी महाराजांचे वर्णन ज्या भागात आले आहे तो भाग या भागामध्ये शिवाजी महाराजांचा अतुलनीय पराक्रम, अपार बुध्दीचा वापर करुन साधलेली राजकारणे, धर्माचा उद्धार या संगळयाचे वर्णन ओजस्वी शैलीत लेखकाने केले आहे. जे आजपर्यंत कोणीही केले नाहीत व पूढे कोणाच्याही मते ही कल्पना शक्य नाही.

## समर्थक शब्दाचा अवलंब :

लेखक शब्दप्रभू असून त्यांनी वापरलेल्या प्रत्येक शब्दाची प्रतीती वाचकांना त्वरीत येते. त्यांच्या शब्दांमध्ये सामर्थ्य असून ते अतिशय संपन्न असे आहेत. उदा. हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत. या वाक्यात दायाद हा शब्द अत्यंत समर्पक आहे. पुढची सहासात वाक्ये ते दायाद चेच स्पष्टीकरण करताना दिसतात. 'आचमनभर उदक तेही लिलाप्रसंगेकडूनही अभिलाषे नये' या वाक्यातही लेखकाच्या सामर्थ्यशाली शब्दाची प्रचिती येते.

### शब्दांच्या मालिका :

लेखक फक्त एक दोनच समर्पक व सामर्थ्यशाली शब्द वापरतो असे नाही तर अशा समर्थ व समर्पक शब्दांच्या मालिकाच तो वापरतो. कोणताही विषय वर्णावयाचा असताना तो शब्दाची मालिकाच हजर करतो उदा. सरकारकून म्हणून प्रधान कसा असावा हे सांगताना लेखकाने तेवीस विशेषणे लावली आहेत. कुलीन, कृतकर्मे, कार्याकार्य विचक्षण, शास्त्रज्ञ राजधर्म विशारद अशा शब्दांची मालिका आज्ञापत्रात पुष्कळ ठिकाणी आढळतात उदा. राजांनी जवळ ठेवलेले सेवक कसे असावे व कसे नसावे? हुजरातील सज्ज ठेवायचे सामान अशा अनेक ठिकाणी या शब्दमालिका येतात.

### सूत्ररुप निवेदन व तत्वार्थबोधक लघुवाक्ये :

वर्ण्यविषयाचे सूत्ररुप निवेदन हा हया ग्रंथकर्त्याच्या लेखनशैलीचा एक विशेष होय. या सूत्रातून एखादा महत्वाचा सिध्दात अथवा तत्वार्थ परिणामकारकरीतीने व्यक्त होताना दिसतो ही सूत्रे अर्थसंपन्न व अनुभव संपन्न आहेत. उदा. 'खजिना म्हणजे राज्याचे जीवन', 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग', 'संपादिले पाठिशी घालोन नित्यनूतन संपादावे', राजे 'लोकास विनोदाचे व्यसन एकंदर नसावे' अशी छोटी छोटी उपदेशापर वाक्ये ठिकठिकाणी विखुरलेली आहेत. या सूत्रामधून राजनितीचे मर्म प्रगट झाले असून लेखकाच्या परिपक्व अनुभवाची या वाक्यातून साक्ष पटते. ही सूत्रे त्यातील अनुभवामुळे हृदयाला जाऊन भिडतात. सुटसुटीत, प्रौढ आणि आशयसंपन्न शब्दाची ही सूत्रे अतिशय प्रभावी व परिणामकारक आहेत.

### अनुपम भावसौंदर्य :

आज्ञापत्र हा ग्रंथ भावसौंदर्याने बहरलेला आहे. भावसौंदर्य असूनही लेखकाने कोठेही गांभीर्य सोडलेले नाही. हे भावसौंदर्य गाढ धर्मश्रध्दा, स्वराज्यनिष्ठा व वीरश्रीतून निर्माण झाले आहे. त्यामुळे एकंदर विवेचनाला उदात्तता प्राप्त झालेली आहे.

प्रकरण तीन 'राजधर्म' ची सुरवातच उदात्तरीतीने झाली आहे. केवळ राजकीय निरुपणात इतक्या गाढ धर्मश्रध्देचा, ईश्वरनिष्ठेचा अविष्कार वाङमयात इतरत्र आढळत नाही. या ग्रंथाचा पायाच ईश्वरनिष्ठा व धर्मश्रध्दा हा आहे. त्यामुळे या ग्रंथावर आध्यात्मिक तेची उदात्त छाया पडली आहे. उदा. 'देशकालपर्व पाहून पर्वादि पुण्यकाळी सदक्षणिक धारादत्त भूमि अथवा ग्राम देणे ते द्यावी' असे सांगितल्यावर पुढे लेखक लिहितो, आणि विधलियावरी कैसाही आपत्काल पडो, प्राणपर्यंत संकटे घडोत. परंतु सहलोकी सुख क्षणैकं हे जाणून, परलोकमय संपूर्ण चितात आणून दिधलियामध्ये आचमनभर उदक तेहि लिलाप्रसंगेकडूनही अभिलाषू नये' या वाक्यातून श्रध्दा, वीरता अनासक्तता प्रकट होताना दिसते.

### आलंकाररहित शैली :

आज्ञापत्र काराची शैली अलंकाररहित आहे. कारण लेखकाला जे काही सांगायचे आहे ते भरीव, महत्वाचे आहे. त्यामुळे आपल्या भाषेला अलंकाराने व कल्पकतेने सजविण्याची त्याला गरज वाटत नाही. ग्रंथाचा विषय व आशय पाहता ते योग्यही आहे. अपवाद म्हणून काही ठिकाणी मधून मधून सुंदर कल्पना आलेल्या दिसतात. उदा 'पून्हा ते पाणी चढते यैसे नाही', 'तेव्हा इतर लोक त्याची भिड कसी वागवितील'? 'इथे भिड म्हणजे वचक' यावर पाण्याचे रुपक केले आहे. 'जैसे कंटकपुष्पवृक्षाची पुष्पे मात्र घेवून परित्याग करावा' या वाक्यात दुराग्रही कंटकपुष्पवृक्षाची उपमा सहज येवून जाते.

या ग्रंथाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यात आलेले काही सिध्दांत हे कालातील व चिरंतन मूल्य असलेले आहेत. शिवकालीन परिस्थिती आज नाही. त्यामुळे या ग्रंथात सांगीतलेली सगळी धोरणे, तत्वे आज उपयोगाची नाहीत. परंतु त्यातील काही भाग असा आहे की तो आजच्या काळातही उपयुक्त व बोधप्रद आहे. उदा. राजाचे व प्राधानाचे गुणधर्म आजच्या राजकीय पुढाऱ्यांना उपयोगी पडणारे आहेत. ईश्वरशरणता, धर्मश्रध्दा, सेवक नियुक्ती विषय दक्षता, राष्ट्रसंरक्षण विषयक कर्तव्य इ. बाबी आजही तिनशे वर्षापूर्वी होत्या तितक्याच ग्राहय आहेत. त्यामुळे हा ग्रंथ केवळ ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचा नसून आजच्या दृष्टीनेही हा ग्रंथ उपयुक्त आहे. मराठयांचे राजकीय तत्वज्ञान सांगणारा प्राचीन मराठी साहित्यातील एकमात्र ग्रंथ म्हणूनही त्याचे मूल्य अनन्यसाधारण आहे.

### संदर्भ ग्रंथ :

1) डॉ. श्री.रं. कुळकर्णी, प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा दु.आ. पुणे -1
2) संपादक श्री.ना. बनहट्टी आज्ञापत्र, हु.आ. नागपूर 1965
3) संपादक विलस खोले, आज्ञापत्र, हु.आ. नागपूर 93